# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये आदेश

---

390 जा.क्र.वि-४/धनाईमाताआदिउपसा/प्रा.अ.नि./आ/सन १८
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (आऊयो) दिंडोरी.
यांचे कार्यालय, निळवंडी रोड, पंचायत समिती समोर,
दिंडोरी, ता.दिंडोरी, जि. नाशिक.
दिनांक :- १७/३/२०१८

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.विकास-४/निवडणुक/माहिती/निधी अपूर्तता/ सन २०१७, दिनांक ४/७/२०१७ व सम दिनांक १६/८/२०१७

२) प्राधिकृत अधिकारी यांनी दिनांक २२/१/२०१८ रोजी संस्थेस अग्रेषित केलेले पत्र.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम कलम ७३ कब व ७७ अ (१-अ)-ब मधील तरतुद व परंतुक.

ज्याअर्थी, धनाईमाता आदि. उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्या.हस्तेदुमाळा, ता.दिंडोरी, जि.नाशिक ही संस्था (जिचा उल्लेख यापुढे 'संस्था' असा केला आहे) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ अन्वये (ज्याचा उल्लेख या पुढे 'अधिनियम' व 'नियम' असा केला आहे) नोंदविण्यात आलेली सहकारी संस्था असुन, तिचा नोंदणी क्रमांक एनएसके/ डीडीआय/ एलएफटी/ १२५५/२००८, दिनांक १३/३/२००८ असा आहे. संस्था व्यवस्थापनाने संस्थेचे कामकाज अधिनियम, नियम व मंजुर उपविधीतील तरतुदीनुसार चालविणे बंधनकारक आहे.

२/- ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७३ कब च्या पोटकलम (१४) (अ) मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक सहकारी संस्थेची समिती ही तिची मुदत संपण्याच्या किमान सहा महिन्यांपूर्वी आपला पदावधी संपण्याबाबत मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण/ निबंधक कार्यालयास कळविल तसेच पोटकलम (ड) मध्ये संस्थेची निवडणूक घेण्यासाठी मतदार यादी सुरळीतपणे तयार करण्याकरीता आवश्यक ती सर्व मदत, सहाय्य व सहकार्य पुरविल अशी तरतुद आहे. त्याअनुषंगाने आपल्या संस्थेची समितीची मुदत संपणार असल्याने/ संपलेली असल्याने या कार्यालयाने या कार्यालयाने तसेच प्राधिकृत अधिकारी यांनी लेखी पत्रान्वये वाचावे क्र.१ व २ आपल्या संस्थेस लेखी पत्र देऊन तसेच वेळोवेळी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क साधून संस्थेची निवडणूक घेण्यासाठी संस्थेच्या सभासदांची प्रारुप मतदार यादी तयार करुन महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियमातील तरतुदीनुसार अंतिम करावी व अंतिम मतदार यादी तसेच निवडणूक निधी मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे खात्यावर जमा करण्याबाबत वेळोवेळी आपणास कळविलेले आहे. तथापि, संस्थेच्या व्यवस्थापनाकडुन त्याची कोणतीही दखल घेण्यात आलेली नसल्याने संस्थेची समिती मुदतीनंतर बेकायदेशिर कार्यरत असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

३/- ज्याअर्थी, या कार्यालयाने तसेच प्राधिकृत अधिकारी यांनी लेखी पत्रान्वये वाचावे क्र.१ व २ अन्वये तसेच यांनी भ्रमणध्वनीद्वारे, आपणास मतदार यादी तयार करुन सादर करणेबाबत आपले संस्थेस वेळोवेळी सूचित केलेले आहे. तसेच कलम ७३ आय (२) मधील तरतुदीनुसार वर नमूद कायदा कलम ७३ कब (१४) मधील तरतुदीनुसार बुध्दीपुरस्सर कसूर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर समितीचे सदस्य त्यांचे अधिकार पद धारण करण्याचे बंद करतील आणि अशा परिस्थितीत निबंधक अधिनियमाच्या कलम ७७-अ अन्वये योजिल्याप्रमाणे कारवाई करील अशी तरतुद आहे. तसेच कलम ७७ अ (१-अ)- ब मधील तरतुदी नुसार

कोणत्याही संस्थेच्या समितीचा किंवा तिच्या कोणत्याही सदस्याचा पदावधी संपला म्हणून — सर्व किंवा कोणतेही सदस्य निवडण्यात कसूर झाली आहे अशी निबंधकाची खात्री झाल्यास संस्थेचा दैनंदिन कारभार पाहण्यासाठी प्राधिकृत अधिका-याची नियुक्ती करता येईल अशी तरतुद नमूद आहे. आपले संस्थेच्या समितीने कायद्यातील कलम ७३ कब (१४) मध्ये नमूद तरतुदीनुसार आपले संस्थेच्या समितीस वाजवी संधी देवूनही त्यांनी बुध्दीपुरस्सर कसुर केलेला असल्याचे सिध्द झालेले आहे व तशी या कार्यालयाची धारणा झालेली आहे. तसेच अधिनियमातील कलम ७७ (अ) खंड (फ) मधील (दोन) मधील दुसऱ्या परंतुकातील तरतुदी नुसार, त्वरीत कार्यवाही करणे आवश्यक असल्याने प्रस्तावित आदेशाच्या संबंधातील हरकती व सुचना मागविणे कामी नोटीस संस्थेच्या सुचना फलकावर प्रसिध्द करणे वाजवीरित्या व्यवहार्य होणार नाही, व त्वरीत कार्यवाही करुन प्राधिकृत अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे उचित होईल, या निर्णयाप्रत हे कार्यालय आलेले आहे.

४/- त्याअर्थी, नमूद संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नियुक्ती बाबत मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## -: आ दे श :-

धनाईमाता आदि. उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्या.हस्तेदुमाळा, ता.दिंडोरी, जि.नाशिक या संस्थेच्या समितीने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० कलम ७३ कब (१४) मधील तरतुदीनुसार बुध्दीपुरस्सर कसूर केलेला असल्याचे सिध्द झाल्याने कायदा कलम ७७ (अ) मधील तरतुदीचा वापर करुन मी, महेश भडांगे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(आऊयो), दिंडोरी, धनाईमाता आदि. उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्या.हस्तेदुमाळा, ता.दिंडोरी, जि.नाशिक या संस्थेचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी श्री.अे.पी.काकड, सहकार अधिकारी(द्वि.श्रे.) यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे.

प्राधिकृत अधिकाऱ्यांनी पदभार घेतल्या पासून सहा महिन्याच्या आंत संस्थेच्या समितीची निवडणूक प्रक्रिया राबवून नवनियुक्त समितीकडे पदभार सोपविण्याची कार्यवाही करावी.

सदरचा आदेश आज दिनांक १७/३/२०१८ रोजी माझे सही व कार्यालयीन मुद्रेसह दिला असे.

( महेश भडांगे )
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (आऊयो), दिंडोरी

दिनांक :- १७/३/२०१८
ठिकाण :- दिंडोरी

**प्रति,**

१) माजी चेअरमन / सेक्रेटरी / संचालक मंडळ, धनाईमाता आदि. उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्या.हस्तेदुमाळा, ता.दिंडोरी, जि.नाशिक.

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, संस्थेचे दप्तर व व्यवस्थापन प्राधिकृत अधिकाऱ्याकडे सुपूर्द करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२) श्री.अे.पी.काकड, सहकार अधिकारी(द्वि.श्रे.), प्राधिकृत अधिकारी, धनाईमाता आदि. उपसा जलसिंचन सहकारी संस्था मर्या.हस्तेदुमाळा, ता.दिंडोरी, जि.नाशिक.

२/- त्यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या कामाकाजाचा पदभार स्विकारुन व सुचना प्रमाणे कार्यवाही करुन तसा अहवाल सादर करावा.

**प्रत माहितीस्तव :-**

१) शाखाधिकारी, नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नाशिक **शाखा** -------------- नाशिक.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**

१) मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक.

२) मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक.

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था (आऊयो), दिंडोरी